मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# पौलाचा कमालीचा प्रवास



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

पौल आणि सिलास हे देवाचे सेवक, तुरुंगात होते. नाही, त्यांनी कोणतीही चुक केली नव्हती - त्यांनी एका बाईच्या अंगातील भुत काढले होते. त्यांनी फिलिप्पै येथील मुर्तिपुजक ...



... लोकांना जिवंत देवाचे
आणि त्याचा पुत्र येशू याचे
सामर्थ्य दाखवून दिले
होते. यामुळे त्यांना अटक
करुन, फटके मारले आणि
त्यांना तुरुंगात कोंडून
ठेवण्यात
आले होते.





तुम्हांला असे वाटले
असेल की यामुळे पौल
आणि सिलास यांना
वाईट वाटले असेल
आणि त्यांना राग
देखिल आला असेल.

खरे तर, मध्यरात्रीच्या सुमारास, त्यांनी परमेश्वराला धन्यवाद देणारी गिते गाईली ! इतर सर्व बंदिवान व तुरुंगाधिकारी त्यांचे ऐकत होते.



अचानक गित गाणे थांबले. तुरुंग हादरवण्यासाठी परमेश्वराने भूमिकंप पाठविला होता. सर्व दारे उघडली गेली. सर्वांचे साखळदंड गळून पडले.



ओहो

–

ओहो !



या गोंधळात सर्व कैदी पळून गेले
असणार याविषयी तुरुंगाधिकाऱ्याची
खात्री पटली होती. त्यांच्यापैकी
एकखादा जरी पळून गेला
तरी तुरुंगाधिकाऱ्याला
मरणदंडाची शिक्षा होती.
दुःखाने त्या बिचाऱ्या
तुरुंगाधिकाऱ्याने त्याची
तलवार काढली. तो देखिल
स्वतः आत्महत्या करुन हे प्रकरण
इथेच मिटवू इच्छित होता.

परंतू इतक्यात पौल मोठ्याने ओरडून म्हणाला, "तूं स्वतःला काही अपाय करुन घेऊ नकोस; कारण आम्ही सर्व जण येथेच आहोत." तुरुंगाधिकाऱ्याने हे पाहिले तेंव्हा त्याने विचारले, "महाराज, माझे तारण व्हावे म्हणून मला काय केले पाहिजे?"



यावर ते म्हणाले, "प्रभू
येशूवर विश्वास ठेव
म्हणजे तुझे व तुझ्या
घरण्याचे तारण होईल."
तुरुंगाधिकाऱ्याने
आनंदाने विश्वास
ठेवला.





दुसऱ्या दिवशी सुटका झाल्यानंतर, पौल आणि सिलास यांनी लोकांना येशूविषयी सांगत पुष्कळ शहरांतून प्रवास केला. काही लोकांनी विश्वास केला, काहींनी त्यांना मारण्याचा प्रयत्न केला.



परंतू परमेश्वर त्याच्या सेवकांबरोबर होता.
एके रात्री पौलाने रात्री उशिरापर्यंत संदेश दिला.
एक तरुण मुलगा घराच्या उघड्या खिडकीत बसून ऐकत होता त्याला झोप लागली. त्यानंतर काय झाले असेल याची तुम्ही कल्पना करु शकता.

तो तरुण मेला आहे हे सर्वांना माहित झाले. परंतू पौल
खाली गेला आणि त्याला जवळ
घेऊन कवटाळले आणि म्हटले,
"अजून तो जिवंत आहे."
त्या तरुणाला जिवंत नेता
आल्यामुळे त्यांना फार
समाधान वाटले.



पौल आणि सिलास युरोपमध्ये प्रवास करित असतांना त्यांना पुष्कळ साहसी प्रवास करावा लागला. पौलाच्या अनेक साहसी प्रवासांपैकी एक साहसी प्रवास, जेंव्हा तो जहाजातून प्रवास करत होता तेंव्हा घडला.



हेआत्तासारखे लोखंडी समुद्री जहाज नव्हते, तर ती एक शीडाची नौका होती. वादळी हवामानात सहज ती नौका इकडे तिकडे फेकली जाईल
अशी होती.






परत अटक झाली होती म्हणून तो जहाजावर होता. आता त्याला त्या दिवसातील जगाची राजधानी असलेले शहर रोम येथे नेण्यात येत होते तेथे त्याला रोमी बादशाहा समोर उभे करण्यात येणार होते.



भयंकर वाऱ्याने नावेची गती कमी केली होती. पुढे वादळी हवामान असल्याचे जाणवत होते. पौल आणि इतर बंदिवासांसाठी तसेच खलाशांसाठी देखिल हि यात्रा भयंकर कठिण होती.

"गृहस्थहो, या जलप्रवासाचा शेवट या अरिष्टाने होईल असे मला दिसते." याप्रकारे पौलाने त्या जहाजात असलेल्या लोकांना चेतावणी दिली. परंतू जहाजाचा कप्तान त्याचे ऐकत नव्हता. ते समुद्रात प्रवासाला निघाले.



जेंव्हा तुफानी वारा त्यांच्यावर आदळला, तेंव्हा त्यांनी ते जहाज फुटू नये म्हणून त्याला दोराने खालून आवळून बांधले. ते जहाज जर फुटले तर त्या सर्वांना जलसमाधी प्राप्त होईल.




जहाज भयंकर वादळात सापडून हेलकावे खात असल्यामुळे, जहाजाच्या कप्तानने त्या जहाजातील अवजड वस्तू पाण्यात फेंकून ते हलके करण्याची मदत करण्याचा आदेश दिला.

तिसऱ्या दिवशी त्यांनी जहाजातून,
जहाजाचे अवजार टाकून दिले.
त्यामुळे कदाचित
मदत
होईल.



रात्रीच्या वेळी, देवाचा दुत पौलाच्या शेजारी उभा राहीला सर्व काही व्यवस्थीत होईल असे सांगितले. पौलाने उभे राहून सर्वांना म्हटले, "गृहस्थांनो, धैर्य धरा, माझा देवावर भरवंसा आहे की त्याने मला जसे कळविले तसेंच घडेल.



तथापि आपल्याला एका बेटावर पडावे लागेल" हे ऐकून इतरांना धिर आला.



काही दिवसांनंतर, मिलिता बेटा जवळ ते जहाज फुटले. जहाज उथळ पाण्यात खडकावर आदळून फुटून गेले. कप्तानने आदेश दिला की, ज्या कोणाला पोहता येते त्याने पाण्यात उडी मारुन किनाऱ्यावर जावे.



कोणी फळ्यांवर, आणि कोणी जहाजातील दुसऱ्या कशावर बसून, ह्याप्रमाणे इतर जण देखिल सुरक्षिपणे बचावून आले.



मिलिता बेटावर परमेश्वराने त्याचे सामर्थ्य दाखवले. जाळण्यासाठी लाकडे गोळा करतांना एका विषारी सापाने पौलाचा चावा घेतला. तो मरेल असे लोकांना वाटले.



परंतू विषारी सापाच्या चावाने पौलाला काहिहि इजा झाली नाही. मग लोकांना वाटले की पौल चांगला मनुष्य आहे. पुष्कळ आजारी लोक आले आणि पौलाने त्यांच्यासाठी प्रार्थना केल्यानंतर परमेश्वराने त्यांना बरे केले.



अखेरिस, पौल रोम येथे येऊन पोचला. न्यायालयातील दाव्याचा निकाल लागण्यासाठी दोन वर्षांचा कलावधि लागला. त्या कालावधिच्या दरम्यान पौलाने एक भाड्याचे घर घेतले होते आणि त्याला भेटणारे तेथे जाऊन भेटू शकत होते.



त्याची भेट घेणाऱ्या लोकांशी पौल कशाविषयी बोलला हे तुम्हांला माहित आहे का? देवाच्या राज्याविषयी ! प्रभू येशू ख्रिस्ताविषयी !



त्याच्या प्रवासाच्या इतर कालावधिप्रमाणे रोममध्ये देखिल पौल देवाचा सेवक होता.

"जे सुयुध्द् ते मी केले आहे, मी धाव संपवली आहे, मी विश्वास राखला आहे," असे पौलाने रोम येथे असतांना लिहिले. त्याच्या जीवनाचा शेवट कसा झाला याविषयी पवित्र शास्त्रात सांगितलेले नाही, परंतू इतर नोंदिनुसार निरो



पौल जसा जगला तसाच मेला – इतरांना प्रभू येशू ख्रिस्ताविषयी सांगणारा, देवाचा विश्वासू सेवक.



# पौलाचा कमालीचा प्रवास

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

प्रेषित १६, २७, २८

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16